

साळ येथे गड्यांच्या रोबंटाला सुरुवात » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



न्यूझीलंडचा पाकिस्तानवर ५ गडी राखून विजय » पान ४ वर

वेर्णा, बुधवार, १९ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 196 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 19 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# ग्रामस्थ, वेदांतची बैठक अनिर्णित

## घरे, मंदिरे खाण भाडेपट्ट्यातून काढण्याच्या मागणीवर मुळगाववासीय ठाम

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १८ : मुळगाव गावातील घरे आणि मंदिरे खाण भाडेपट्ट्यातून काढून टाकण्याच्या मागणीवर ठाम असलेल्या ग्रामस्थांनी मंगळवारी उत्तर गोव्याच्या जिल्हाधिकारी स्नेहा गित्ते (आयएएस) आणि वेदांत लिमिटेडच्या अधिकाऱ्यांसोबत झालेली बैठक अनिर्णित सोडली. या बैठकीला डिचोलीचे आमदार चंद्रकांत शेट्ये, गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आणि खाण व भूगर्भशास्त्र संचालनालयाचे अधिकारी, वेदांत लिमिटेडचे प्रतिनिधी,श्री केळबाई देवस्थान समितीचे अध्यक्ष वसंत गाड, मुळगाव कोमुनिदादचे अध्यक्ष महेश्वर परब, मुळगाव सरपंच मानसी कवठणकर, पंचायत सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते.**

बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना आमदार चंद्रकांत शेट्ये म्हणाले, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी ५० मीटरचा बफर झोन निश्चित करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. मात्र, ग्रामस्थांनी १०० मीटरचा बफर झोन असला पाहिजे, अशी भूमिका घेतली. तसेच, तलावाच्या मुद्द्यावर चर्चा झाली असता हे प्रकरण सध्या राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण समोर असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

रोजगाराच्या मुद्द्यावर शेट्ये म्हणाले, जर कंपनी नियमांचे पालन करत असेल, तर मुळगावातील स्थानिकांना रोजगार का मिळत नाही? ग्रामस्थांनी धूळ का खावी? आम्हाला शाश्वत खाणकामाची गरज आहे, मात्र ग्रामस्थांच्या शंका दूर झाल्या पाहिजेत. मी ग्रामस्थांच्या मागण्यांना पाठिंबा देतो आणि कंपनीने या मागण्यांवर गांभीर्याने विचार करावा.

श्री केळबाई देवस्थान समितीचे अध्यक्ष वसंत गड म्हणाले,खाण भाडेपट्ट्यात दाखवलेली घरे आणि मंदिरे त्वरित काढून टाकावीत, याबाबत आम्ही ठाम आहोत. अन्य काही मुद्दे दुय्यम आहेत, परंतु प्रथम घरे आणि मंदिरे भाडेपट्ट्यातून वगळली गेली पाहिजेत. ते पुढे म्हणाले की, घरांपासून अवघ्या ५० मीटर अंतरावर खाणकाम झाल्यास ग्रामस्थांना धूळ आणि ध्वनी प्रदूषणाचा सामना करावा लागेल. त्यामुळे आम्ही ५० मीटरचा बफर झोन स्वीकारणार नाही.

गेल्या महिन्यात मुळगाव ग्रामस्थांनी पंचायत सदस्यांसह डिचोली खाण ब्लॉक-१ वर मोर्चा काढला होता. खाणकामामुळे होणारे ध्वनी आणि धूळ प्रदूषण तात्काळ थांबवण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यानंतर वेदांत लिमिटेडच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक बोलावण्यात आली होती. मात्र, कंपनीकडून ठोस आश्वासन न मिळाल्याने स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली होती. बैठकीत भातशेतीतील गाळ काढणे, २०११ पासून प्रलंबित असलेली शेतकऱ्यांची भरपाई आणि डिचोली खाण ब्लॉकमध्ये येणाऱ्या २.२१ लाख चौरस मीटर क्षेत्रासाठी मुळगाव कम्युनिडेडला भाडेपट्टा थकबाकी देण्याच्या मागण्यांवर चर्चा झाली. वेदांत लिमिटेडच्या अधिकाऱ्यांनी २०१८ पर्यंतची भरपाई देण्याचे मान्य केले असून, उर्वरित मागण्यांवर लवकरच तोडगा काढला जाईल, असे आश्वासन दिले. मात्र, ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांनी हो' किंवा नाही' असे स्पष्ट उत्तर न दिल्याचे सांगितले.

वेदांत लिमिटेडने बैठकीनंतर जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुळगाव ग्रामस्थांनी मांडलेल्या सर्व मुद्द्यांचा गांभीर्याने विचार केला जात आहे आणि कंपनी लवकरच या प्रकरणाचा तोडगा काढेल.

दरम्यान, डिचोली मधील ट्रकचालकांनी खाण कंपनीने अयस्क वाहतुकीसाठी कंत्राटदारामार्फत ट्रक बाहेरून आणण्याच्या निर्णयाचा निषेध केला आहे. ट्रक चालकांनी कंपनीच्या मुख्य गेटसमोर निदर्शने केली आणि बाहेरील ट्रक मागे घेण्याची मागणी केली.

सेसा मायनिंग ट्रक ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजाराम गावकर म्हणाले,कंपनीने बाहेरील ट्रक मागे घेतल्याशिवाय आम्ही आमचे ट्रक चालवणार नाही. आमच्याकडे १८० ट्रक मालक आहेत आणि बाहेरील ट्रक आल्यामुळे आम्हाला रोजगार मिळत नाही.

# हिंसाराचानंतर नागपुरात कर्फ्यू

▶ कबरीचा वादावरून तुफान राडा

▶ ५० जण ताब्यात, १५ हून अधिक पोलिस जखमी

नागपूर, दि. १८ :

औरंगजेबाची कबर हटवण्यावरून नागपुरातील महाल परिसरात सोमवारी रात्री दोन गटांच्या तरुणांमध्ये जोरदार राडा झाला. काही वेळातच दगडफेक आणि वाहनांची जाळपोळ झाली. पोलिसांना जमाव पांगवण्यासाठी लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर करावा लागला. या घटनेत १५ हून अधिक पोलिस कर्मचारी जखमी झाले आहेत. काही नागरिकही जखमी झाले आहेत. आतापर्यंत ५० जणांना ताब्यात घेण्यात आले असून कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिला आहे. दरम्यान, आता नागपुरातील काही भागात पुढील आदेश येईपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. नागपूर पोलिस आयुक्त रविंदर कुमार सिंगल यांनी यासंदर्भात आदेश जारी करून पुढील सूचना मिळेपर्यंत निर्बंध लागू राहणार असल्याचे म्हटले आहे.

हिंदू संघटनांकडून छत्रपती संभाजीनगर येथील औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी काही दिवसांपासून सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने सोमवारी आंदोलन पुकारले होते. सकाळी शिवाजी पुतळ्याजवळ आंदोलन केल्यानंतर, मुस्लिम धर्मीयांसाठी पवित्र समजल्या जाणाऱ्या काही ओळी जाळण्यात आल्याची चर्चा पसरली. दुपारी याच्या निषेधार्थ मुस्लिम समुदायाकडूनही आंदोलन करण्यात आले. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून दोन्ही गटांना रोखले. मात्र संध्याकाळी दोन्ही गट पुन्हा आमनेसामने आले आणि घोषणाबाजी, दगडफेक झाली. या दगडफेकीमध्ये अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे. दगडफेकीसोबत जाळपोळही करण्यात आली. यामुळे परिसरात तणाव वाढला. घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले. पोलिस प्रशासन परिस्थिती नियंत्रणात आणत असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## निवडक

### 'चांद्रयान-५'ला केंद्राची मान्यता

नवी दिल्ली, दि. १८ : अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) चंद्राच्या पृष्ठभागाचा अभ्यास करणार आहे. यासाठी इस्रो चांद्रयान-५ मोहीम राबवणार आहे. नुकतीच या मोहिमेला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे, अशी माहिती इस्रोचे नवीन अध्यक्ष व्ही. नारायण यांनी दिली. फक्त तीन दिवसांपूर्वीच आम्हाला चांद्रयान-५ मोहिमेला मंजुरी मिळाली. यामध्ये जपान आमचा मित्र असेल. चांद्रयान-३ मोहिमेत २५ किलो वजनाचा रोव्हर (प्रज्ञान) होता, तर चांद्रयान-५ मोहिमेत चंद्राच्या पृष्ठभागाचा अभ्यास करण्यासाठी २५० किलो वजनाचा रोव्हर असेल, असे ते म्हणाले. २०२७ मध्ये सुरू होणाऱ्या चांद्रयान-४ मोहिमेचे उद्दिष्ट चंद्रावरील मातीचे नमुने आणणे आहे. गगनयानसह अनेक मोहिमांव्यतिरिक्त अंतराळात भारताचे स्वतःचे अंतराळ स्थानक स्थापन करण्याच्या योजना सुरू आहेत, असे नारायणन म्हणाले.चांद्रयान-३ मोहीम यशस्वी झाल्यानंतर चांद्रयान-४ मोहिमेला गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती.

--------------

### एप्रिलपासून टीडीएस बदलणार

नवी दिल्ली, दि. १८ : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केंद्रीय बजेट २०२५ मध्ये टीडीएस आणि टीसीएस नियमांत बदल केले आहेत. १ एप्रिल २०२५ पासून हे नियम लागू होणार आहेत. त्यामुळे एफडी, आरडी आणि अन्य डिपॉझिट स्कीमवर १ लाख रुपयांपर्यंतच्या कोणत्याही व्याजावर टीडीएस कपात केली जाणार नाही. आधी ही रक्कम कमी होती. ज्यात ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. सामान्य नागरिकांसाठी टीडीएस कपातीची मर्यादा ४० हजारांवरून ५० हजार रुपये करण्यात आली आहे. आता ५० हजारांपर्यंतच्या एफडीच्या व्याजावर कोणतेही टीडीएस लागणार नाही. डिव्हिडेंड इन्कमच्या टीडीएस सूटची मर्यादा ५ हजारांवरून १० हजार करण्यात आली. इन्शुरन्स एजंटसाठी टीडीएस सूटची मर्यादा १५ हजारांवरून २० हजार करण्यात आली आहे.

-------------

### युद्धबंदीनंतरही गाझामध्ये हवाई हल्ले

गाझा, दि. १८ : इस्रायलने पुन्हा एकदा गाझामध्ये मंगळवारी सकाळी हवाई हल्ले सुरू केले आहेत. सुमारे १२ तासांपासून सुरू असलेल्या इस्रायली हल्ल्यात आतापर्यंत ४१३ लोकांचा मृत्यू झाला आहे आणि शेकडो लोक जखमी झाले आहेत. या हल्ल्यामुळे, गाझा आणि इस्रायलमधील १९ जानेवारी रोजी स्वाक्षरी झालेला दोन महिन्यांचा युद्धविराम मोडला गेला आहे. इस्रायलचा दावा आहे की, ते हल्ल्यांचे नियोजन करणाऱ्या दहशतवाद्यांना लक्ष्य करत आहे. त्याच वेळी, गाझाच्या दहशतवादी संघटनेचे म्हणणे आहे की, नेतन्याहू यांचा पुन्हा युद्ध सुरू करण्याचा निर्णय इस्रायली ओलिसांना मृत्युदंड देण्यासारखा आहे. या हल्ल्यानंतर, हमासने ताब्यात घेतलेल्या सुमारे २ डझन इस्रायली ओलिसांच्या सुटकेबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. दुसरीकडे, इस्रायली सैन्याने लोकांना पूर्व गाझा रिकामा करण्याचे आदेश दिले आहेत.युद्धबंदीच्या चर्चा प्रगतीपथावर नसल्याने त्यांनी हल्ल्यांचे आदेश दिले, असे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी सांगितले. नेतन्याहू यांनी अनेक वेळा पुन्हा युद्ध सुरू करण्याची धमकी दिली आहे.

### हवामान

कमाल : ३८ किमान : २६
आर्द्रता : ६१

### बाजार भाव

सोने : ₹ ९०,३८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,०२,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७३,३६५ .७७ ↑ (३१.२९)
निफ्टी : २२,२३५.९० ↑ (८३.९५)

# मडगाव नगरपरिषदेच्या दरवाढीचे नगराध्यक्षांकडून समर्थन

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १८ : मडगाव नगरपरिषदेचे (एमएमसी) अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी मडगाव पालिकेच्या दरवाढीवर झालेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना, पालिकेच्या प्रचंड आर्थिक खर्चाचा सामना करण्यासाठी ही दरवाढ आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

मंगळवारी माध्यमांशी बोलताना शिरोडकर म्हणाले की, महापालिकेच्या लेखा विभाग, मुख्याधिकारी आणि इतर कर्मचाऱ्यांनी सखोल अभ्यास केल्यानंतरच ही दरवाढ निश्चित करण्यात आली आहे. चार तास चाललेल्या पालिका बैठकीत नगरसेवकांचा अभिप्राय विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आला, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरवाढीवर झालेल्या टीकेवर प्रतिक्रिया देताना शिरोडकर यांनी मडगावचे आमदार यामध्ये सहभागी असतानाही अनावश्यक वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

शिरोडकर यांनी वास्को,म्हापसा आणि पणजी महानगरपालिका (सीसीपी) यांच्याशी शुल्कांची तुलना करत, मडगाव पालिकेने पूर्वी अतिशय कमी दर आकारले होते, असे स्पष्ट केले. काही विशिष्ट श्रेणी वगळता इतर सर्व श्रेणींमध्ये केवळ १५ ते २० टक्के दरवाढ करण्यात आली आहे, जी वाजवी असल्याचे त्यांनी नमूद केले. मागील अनेक वर्षांपासून शुल्कवाढ करण्यात आलेली नव्हती, असेही त्यांनी सांगितले.

नगर परिषदेच्या आर्थिक स्थितीवर भाष्य करताना शिरोडकर म्हणाले की, एमएमसीला कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी दरमहा तब्बल २.५४ कोटी रुपये खर्च करावे लागतात. याशिवाय, देखभाल दुरुस्ती, गॅरेज देखभाल आणि इतर खर्चही नियमितपणे करावे लागतात.

बेकायदेशीर व्यवसायांविषयी शिरोडकर यांनी माहिती देताना सांगितले की, बाजार निरीक्षकांनी सुरू केलेल्या सर्वेक्षणात ४० ते ४५ टक्के आस्थापना व्यापार परवान्याशिवाय चालवल्या जात असल्याचे आढळून आले आहे. यासंदर्भात कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून, भाडेकरू आणि घरमालकांमधील तक्रारी लक्षात घेऊन पुढील कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

शिरोडकर यांनी एमएमसी कर्मचाऱ्यांनी केलेल्या १७ लाख रुपयांच्या अपहार प्रकरणावरही भाष्य केले. या प्रकरणाचा तपास एका महिन्यात पूर्ण होईल आणि संबंधित निधीची वसुली केली जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच थकबाकी वसुलीसाठी मागील सोपो कलेक्टरसोबतचा मुद्दा लवकरच सोडवला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# महिला पोलिस अधिकाऱ्यांच्या वर्तनाची मानवाधिकार आयोगाकडून दखल

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १८ :** महिला पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी बाल कल्याण समितीच्या (सीडब्ल्यूसी) सदस्यांशी केलेल्या असभ्य वर्तनाची दखल घेत, गोवा मानवाधिकार आयोगाने भविष्यात लैंगिक शोषणाच्या प्रकरणांमध्ये बाल कल्याण समिती आणि पोलिसांमध्ये समन्वय वाढवण्याची शिफारस केली आहे. तथापि, आयोगाला या प्रकरणात मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्याचे आढळलेले नाही.

उत्तर गोव्यातील बाल कल्याण समितीने महिला पोलिस ठाण्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार, बांबोळी येथील मानसोपचार आणि मानवी वर्तन संस्था येथे पीडित मुलीची वारंवार मानसिक चाचणी घेतल्याबद्दल आणि बाल कल्याण समिती अध्यक्ष आणि सदस्यांशी असभ्य वर्तन केल्याबद्दल आक्षेप नोंदवण्यात आला होता. बाल कल्याण समितीने आपल्या तक्रारीत दोषी अधिकाऱ्यांविरोधात चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. तसेच, पोक्सो कायद्यांतर्गत पीडित अल्पवयीन मुलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि मानसिक चाचणीसाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची मागणी केली होती.

बाल कल्याण समितीने चौकशी केलेल्या प्रकरणात, पीडित मुलीने तिच्या भावाने, काकाने आणि प्रियकराने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला होता. यानंतर समितीने महिला पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर, भारतीय दंड संहिता , गोवा बाल संरक्षण कायदा आणि कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला होता.

समितीने पीडित मुलीला वैद्यकीय तपासणीसाठी नेले असता, महिला पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना याची कल्पना देण्यात आली होती. पीडित मुलीचे मानसिक मूल्यांकन पहलेच अपना घर अधिकाऱ्यांनी केले होते, त्यामुळे पोलिसांनी फक्त संबंधित अहवाल गोळा करावा, असे निर्देश देण्यात आले होते.

तथापि, सूचना असूनही संबंधित पोलिस अधिकाऱ्यांनी पीडित मुलीला आयपीएचबी येथे पुन्हा मानसिक चाचणीसाठी नेले. यासोबतच, बाल कल्याण समिती च्या सदस्यांना असभ्य वर्तनाचा सामना करावा लागला.

१५ जानेवारी २०२५ रोजी बाल कल्याण समिती अध्यक्षांनी महिला पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याशी फोनवर संपर्क साधला असता, अधिकाऱ्याने उद्धट वर्तन केले आणि पीडित मुलीच्या चाचणीसंदर्भात अनावश्यक आक्षेप घेतले. पोलिस अधिकाऱ्याने असे सांगितले की चाचणी गोवा बाल न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आली होती आणि बाल कल्याण समिती त्यांच्या पद्धतीनुसार काम करू शकते.

बाल कल्याण समितीने आरोप केला आहे की संबंधित महिला पोलिस अधिकाऱ्यांनी बाल न्याय कायद्यांतर्गत बाल कल्याण समितीला दिलेल्या अधिकारांचे उल्लंघन केले आहे. समितीच्या सदस्यांचा अपमान केला गेला असून समितीच्या अधिकारांवरही गदा आणली गेली आहे.

गोवा मानवाधिकार आयोगाने हा संपूर्ण प्रकार गंभीरपणे घेतला असून भविष्यात पोलिस आणि बाल कल्याण समिती यांच्यात समन्वय वाढवण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. तथापि, या प्रकरणात मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्याचे आयोगाला आढळले नाही.

महिला पोलिस ठाण्याच्या पोलिस अधीक्षक एझिल्डा डिसोझा यांनी आपल्या निवेदनात पोलिस अधिकाऱ्यांचे वर्तन सभ्य होते आणि पीडित मुलीच्या सुरक्षेला कोणताही धोका निर्माण झाला नसल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यामुळे २१ जानेवारी २०२५ रोजी दाखल करण्यात आलेली तक्रार रद्द करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

# धूळ प्रदूषणाचा कहर; स्थानिक त्रस्त, आरोग्य धोक्यात

## उंदीर, बांदोडा येथील प्रकार : प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार दाखल

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. १८ :** जहाज बांधणी कंपनीतील वाळू ब्लास्टिंगमुळे उंदीर, बांदोडा येथील स्थानिक नागरिकांना गंभीर धुळीच्या प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे रहिवाशांना श्वासोच्छवासाच्या अडचणी, खाज आणि कोरड्या खोकल्याचा त्रास जाणवत आहे. स्थानिकांनी या संदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार दाखल केली होती.

स्थानिकांचे म्हणणे आहे की, कंपनीच्या कामामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. मात्र, कंपनीच्या विरोधात नसून धुळीच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी ते करत आहेत. गेल्या वर्षभरापासून झुआरी नदीवरील डॉकमध्ये मोठ्या जहाजाचे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे परिसरात सतत धुळीचे लोट पसरत आहेत, ज्यामुळे वृद्ध आणि लहान मुलांना विशेषतः त्रास होत आहे.

स्थानिक रहिवाशांनी ९ डिसेंबर २०२४ रोजी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार दाखल केली होती. मात्र, मंडळाच्या अधिकाऱ्यांनी तब्बल तीन महिने आणि नऊ दिवसांनंतर म्हणजेच १८ मार्च २०२५ रोजी घटनास्थळी पाहणी केली. पाहणीनंतर अधिकाऱ्यांनी कंपनीला धुळीचे प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत. निरीक्षण अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केला जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

प्रियांका नाईक या स्थानिक महिलेने सांगितले की, बारा वर्षांनंतर माझ्या मुलाचा जन्म झाला आहे. तो सात महिन्यांचा असून सतत आजारी असतो. चार वेळा त्याला रुग्णालयात दाखल करावे लागले आहे. वाळू ब्लास्टिंगमुळे घरात धुळीचे कण शिरत आहेत, त्यामुळे माझ्या मुलाच्या आरोग्याला धोका आहे.



दुसरी रहिवासी सीमा नाईक यांनी सांगितले की, कंपनी नफा कमवत आहे, पण त्याचा त्रास आम्हाला सहन करावा लागत आहे. धुळीमुळे डोळ्यांना खाज सुटणे, वेदना होणे आणि श्वास घेण्यास अडचण येत आहे. कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक विठोबा पोळके यांनी सांगितले की, सतत धुळीच्या संपर्कात राहिल्यामुळे खोकला आणि खाज येण्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यामुळे गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात.

स्थानिकांच्या मते, धुळीमुळे परिसरातील पिण्याच्या विहिरींचे पाणीही दूषित झाले आहे. नळांना पाणीपुरवठा होत नसल्याने पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. प्रज्योत नाईक यांनी सांगितले की, आमच्या तक्रारीकडे सुरुवातीला दुर्लक्ष करण्यात आले होते. आता कंपनीने हे काम ड्राय डॉक किंवा अन्य ठिकाणी हलवावे जेणेकरून प्रदूषणाचा त्रास थांबेल.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कंपनीला धुळीचे प्रदूषण थांबवण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले असले, तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. स्थानिकांनी कंपनीने आरोग्याच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करावी आणि जहाज बांधणीचे काम वेगळ्या ठिकाणी हलवावे, अशी मागणी केली आहे.